क्र.साप्रवि/खका/न.क्र. २८

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ८२ दिनांक १७/१०/२००६

विषय : वीज चोरी प्रकरणी न्यायप्रविष्ट खटल्याच्या वेळी साक्षीदार म्हणून हजर रहाणा-या कंपनीबाहेरील 'पंच' व्यक्तींना प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अदा करणे.

.....

वीज चोरीच्या गुन्हयाची तपासणी सुरु असताना विद्युत वितरण कंपनी बाहेरील आसपासच्या रहिवाशामधील दोन किंवा दोनपेक्षा जास्त सन्माननीय व्यक्ती पंच म्हणून घ्याव्यात आणि त्यांच्या समक्षच वीज चोरी संबंधिचा शोध/तपासाचे काम पूर्ण करावे अशा सूचना द.व सु. विभागाचे परिपत्रक क्र.द.व सु./अंमल/२७३१ दि.२९.६.२००४ अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. या प्रकरणी कायद्यानुसार करावा लागणारा पंचनामा पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात दाखल करण्यात येणा-या न्यायालयीन खटल्याच्या सुनावणीसाठी पंचनाम्याच्या वेळी हजर असणा-या 'पंच' व्यक्तींना न्यायालयात साक्ष देण्यास बोलविण्यात येते.

२. तथापि, सदर खटल्याची कंपनीच्या बाजूने साक्ष देण्यासाठी बोलाविण्यात येणा-या पंचाना जाण्या-येण्याकरिता कराव्या लागणा-या दौ-याचा प्रवास खर्च व दैनिक भत्ता देण्याची तरतूद विद्यमान विनियमात नाही. यास्तव, वीज चोरीला आळा बसावा व न्यायालयीन खटल्याचा योग्य निर्णय कंपनीच्या बाजूने लागावा या दृष्टीने न्याय प्रविष्ट खटल्याच्या सुनावणीकरिता साक्ष देण्यासाठी 'पंच' म्हणून उपस्थित रहाणा-या कंपनीच्या बाहेरील व्यक्तींना न्यायालयामध्ये जाण्या-येण्याकरीता प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देण्याची तरतूद करावी असा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

३. याबाबत, सर्वंकष विचारांती कंपनीच्या बाजूने साक्ष देण्यासाठी न्यायालयात साक्षीदार म्हणून हजर रहाणा-या 'पंच' व्यक्तींना जाण्या-येण्याकरिता प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देण्यास मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (दवसु) यांच्या सहमतीने व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करून खालील प्रमाणे मंजुरी दिली आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (अ) | रेल्वेने प्रवास करण्याकरिता | - | वातानुकूलित खुर्चीयान / तृतिय श्रेणी वातानुकूलित शयनयानचे प्रत्यक्षातील भाडे | |
| (ब) | सार्वजनिक वाहनातून (बसमधून) | - | सर्व सामान्य बस/जलद/वातानुकूलित लक्झरी बसचे प्रत्यक्षातील भाडे | |
| (क) | दैनिक भत्ता | - | महाराष्ट्रातील ठिकाणासाठी | महाराष्ट्राबाहेरील ठिकाणासाठी |
| | | | रु.१००/- | रु.१५०/- |

३. साक्षीदार 'पंच' व्यक्तींनी न्यायालयीन खटल्यामध्ये महावितरण कंपनीच्या बाजूने साक्ष देण्याच्या कामाकरिता प्रवास केलेला आहे याचा पुरावा म्हणून न्यायालयाच्या समन्सची प्रत संबंधित कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित झाल्याच्या तारखेपासून लागू होईल.

(सु.य. पाटील)
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत,

१) क्षेत्रीय कार्यालयातील कार्यकारी अभियंता व त्यावरील दर्जाचे सर्व अधिकारी यांना
- महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार.

२) निगम कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख आणि कक्ष प्रमुख यांना
- महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार.